नवराष्ट्र
www.navarashtra.com

# मॉडर्न हायस्कूलमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती

भंडारा, ब्युरो. क्विक हिल फाऊंडेशनच्या सहकार्याने मॉडर्न हायस्कूल, सातोना येथे सायबर सुरक्षा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जे. एम. पटेल महाविद्यालयात संगणक शास्त्र विभागाचे विद्यार्थी उत्कर्ष गणवीर व विजय लांजेवार यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. यावेळी सायबर वॉरिअर उत्कर्ष गणवीर व विजय लांजेवार यांनी सायबर हल्ल्यांपासून स्वतः आणि कुटुंबाचे संरक्षण कसे करावे, सोशल मीडिया व डिजीटल प्लॅटफॉर्मवर सतर्क कसे राहावे, याबाबत प्रत्यक्ष उदाहरणासह सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. मुख्याध्यापक एम. सी. भावनकुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

Bhandara Plus Edition
Sep 18, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com